नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | Year - 4rd | अंक - २५ | Issue - 25 | वार - शुक्रवार दि. १९ जून २०२६ | Blow- Friday Date 19 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ठाकरेंचे सहा खासदार फुटले



## ठाकरेंना सोडणाऱ्या सहा खासदारांच्या विलिनीकरणासाठी शनिवारचा मुहूर्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शिवसेनेच्या ऑपरेशन टायगरबद्दलची आताची सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. ज्या सहा खासदारांनी ठाकरेंना सोडून स्वतंत्र गट निर्माण केला आहे त्यांच्या विलिनीकरणाची घोषणा संसदेकडून शनिवारी केली जाणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे ऑपरेशन टायगर यसस्वी झालं असलं तरी त्याची घोषणा ही शिवसेनेच्या वर्धापणदिनानंतरच केली जाणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. सहा खासदारांनी त्यांच्या सह्यांचं पत्र हे लोकसभा अध्यक्षांना दिलं आहे. त्यामध्ये उद्धव ठाकरे यांची शिवसेना ही काँग्रेसमध्ये विलिनीकरण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची भीती त्यामध्ये खासदारांनी व्यक्त केली आहे. हे पत्र गेल्या ४८ तासांपूर्वी देण्यात आलं असलं तरी त्याची घोषणा आता लगेच करण्यात आली नाही. त्यामुळे शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या दिवशी म्हणजे २० जून रोजी याची घोषणा शिंदेंच्या शिवसेनेकडून करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

त्याच दिवशी संसदेकडून बुलेटिन जारी करण्यात येणार असून त्यामध्ये या सहा खासदारांच्या शिंदेंच्या शिवसेनेमध्ये विलिनीकरण होत असल्याचं जाहीर करण्यात येण्याची शक्यता आहे, असं मेघा प्रसाद म्हणाल्या. या वेळी लोकसभा अध्यक्ष कदाचित ठाकरेंच्या शिवसेनेच्या नेत्यांना बोलावून चर्चा करतील. परंतु अंतिम निर्णय हा लोकसभा अध्यक्षांचा असेल असं मत मेघा प्रसाद यांनी व्यक्त केलं.

चार वर्षानंतर ठाकरेंच्या शिवसेनेला पुन्हा मोठा धक्का बसला आहे. एकनाथ शिंदेंचं ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्याचं जवळपास स्पष्ट झालं आहे. गुरुवारी दिल्लीत झालेल्या ठाकरेंच्या शिवसेनेच्या संसदीय दलाच्या बैठकीला पक्षाचा व्हीप धुडकावून ६ खासदार अनुपस्थित राहिले. हे तेच ६ खासदार आहेत जे बंडखोरी करून शिवसेनेत जाणार असल्याची चर्चा होती.

या बैठकीला फक्त संजय राऊत, अरविंद सावंत, अनिल देसाई आणि राजाभाऊ वाजे हे चारच खासदार हजर होते. गैरहजर खासदारांना पक्षाने नोटीस पाठवली असून ७ दिवसांत उत्तर न दिल्यास कारवाईचा इशारा दिला आहे. त्यामुळे ठाकरेंचे सहा खासदार शिंदेंच्या शिवसेनेत जाणार हे जवळपास निश्चित मानलं जात आहे.

त्याचवेळी फुटलेल्या ६ खासदारांविरोधात ठाकरेंची शिवसेना आक्रमक झाली आहे. आमच्या पक्षातून निवडून आलात तर आता राजीनामा द्या, असं आव्हान संजय राऊतांनी दिलं. तर आता आमचं ऑपरेशन तुडवा सुरु होणार असा इशाराही राऊतांनी दिला.

# बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा; कोकणात पावसाचा जोर वाढणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशभरात आणि महाराष्ट्रात दाखल झाल्यानंतर अचानक थबकलेल्या मान्सूनच्या प्रगतीसाठी आता पुन्हा एकदा अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे येत्या तीन दिवसांत मान्सून वाऱ्यांचा वेग वाढणार असून, २४ ते २५ जूनच्या सुमारास कोकण किनारपट्टीवर पावसाचा जोर लक्षणीयरीत्या वाढेल, असा अंदाज मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवला आहे. या बदलामुळे गेले काही दिवस उन्हाचा आणि उकाड्याचा तडाखा सहन करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. यंदा केरळमध्ये उशिराने दाखल झालेल्या मान्सूनने ६ जून रोजी तळकोकणात धडक दिली होती. त्यानंतर ८ जूनपर्यंत त्याने हर्णे आणि सोलापूरपर्यंत मजल मारली. मात्र, पुढील वाटचालीस पोषक वातावरण नसल्यामुळे मान्सूनची उत्तर सीमा गेल्या अनेक दिवसांपासून एकाच जागेवर स्थिर आहे. त्यामुळे जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पावसाने मोठी ओढ दिली असून, कोकण आणि गोव्यात १ ते १७ जून दरम्यान सरासरीच्या तुलनेत तब्बल ८१ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे.मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये पुढील काही दिवस या भागात हवामान मुख्यतः कोरडे राहण्याची शक्यता असून, २४ जूननंतरच पावसाचा जोर वाढेल. तर दक्षिण कोकणातील रत्नागिरी, रायगड आणि सिंधुदुर्गमध्ये २१ जूनपर्यंत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळतील. मात्र, सिंधुदुर्ग वगळता इतर भागात १९ जूनपर्यंत उष्ण आणि दमट वातावरण कायम राहील. विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि गुजरातच्या काही भागांत पुढील चार ते पाच दिवसांत हलक्या पावसाची शक्यता आहे.




वादळी पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, दक्षिण भारतापासून उत्तर भारतापर्यंत मान्सून वारे आता वेग घेत आहेत. १८ जूनपासून उत्तर-पश्चिम भारताच्या दिशेने वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

या राज्यांना मिळणार दिलासा पुढील ४ ते ५ दिवसांत तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार, छत्तीसगड आणि उत्तर प्रदेशच्या आणखी काही भागांत नैऋत्य मान्सूनच्या प्रगतीसाठी मार्ग मोकळा झाला आहे. तसेच उत्तर भारतातील दिल्ली, पंजाब आणि हरियाणा या राज्यांमध्येही ढगाळ वातावरणासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे, ज्यामुळे तेथील तापमानात घट होऊन तीव्र उष्णतेपासून नागरिकांची सुटका होईल. देशभरात पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे शेतकरी चिंतेत होते; मात्र आता हवामान प्रणाली पुन्हा सक्रिय झाल्याने पेरण्यांच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा असून सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसीय महाराष्ट्र दौऱ्यावर येत असून, १९ आणि २० जून रोजी ते कोल्हापूर जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर परिसरातील महत्त्वाकांक्षी विकास आराखड्या अंतर्गत पूर्ण झालेल्या विविध विकासकामांचे उद्घाटन आणि निर्माणाधीन प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. पश्चिम महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या दौऱ्यामध्ये गृहमंत्र्यांच्या हस्ते ऐतिहासिक विकासकामांचे लोकार्पण होणार असल्याने, प्रशासकीय व राजकीय वर्तुळात या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

१९ जून रोजी अंबाबाई मंदिर परिसराच्या सौंदर्यीकरण आणि पायाभूत सुविधांशी संबंधित पूर्ण झालेल्या कामांचा लोकार्पण सोहळा त्यांच्या हस्ते पार पडेल. कोल्हापूर येथील महालक्ष्मी मंदिराचा कायापालट करण्यासाठी आणि भाविकांच्या सोयीसाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विशेष विकास आराखडा राबवला जात आहे.




**राज्य सरकारकडून उच्चस्तरीय समिती गठीत**

# शेतकरी कर्जमुक्तीच्या निकषांमध्ये सुधारणा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : महायुती सरकारने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'च्या अंमलबजावणीबाबत शेतकरी वर्गातून उमटणाऱ्या प्रतिक्रियांची राज्य सरकारने दखल घेतली आहे. या योजनेची अधिक प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचनांमधील निकषांमध्ये बदल केले जाणार आहेत. त्यानुसार, कर्जमुक्ती योजनेच्या नियमावलीत सुटसुटीतपणा आणण्यासाठी आणि विविध प्रशासकीय विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी तीन वेगवेगळ्या उच्चस्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

**अटी शिथिल होणार असल्याने लाखो शेतकऱ्यांना दिलासा**

यामधील मुख्य समितीचे नेतृत्व राज्याच्या मुख्य सचिवांकडे सोपवण्यात आले असून, या त्रिसदस्यीय समितीच्या माध्यमातून पात्र शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीने निकष बदलण्याची प्रक्रिया गतिमान करण्यात आली आहे.

तांत्रिक अटींमुळे प्रत्यक्ष गरजू आणि नैसर्गिक आपत्तीने खचलेला सामान्य शेतकरी या लाभापासून वंचित राहू नये, हाच या निकष सुधारणेमागील मुख्य उद्देश आहे. राज्य सरकारच्या या नवीन कर्जमुक्ती योजनेअंतर्गत राज्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे.

तसेच कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्याचे नियोजित आहे.



राष्ट्रीयकृत बँका, खासगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसह विविध प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांकडून घेतलेल्या कर्जांना हे धोरण लागू करण्यात आले आहे.

मात्र, वारंवार कर्जमाफीचा लाभ घेणाऱ्या घटकांमुळे बँकिंग व्यवस्था कोलमडू नये, म्हणून सुरुवातीला काही तांत्रिक अटी आणि निकष घालण्यात आले होते. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील ही समिती आता याच मार्गदर्शक तत्त्वांची पुनर्रचना करणार आहे.

जिल्हा पातळीवर संनियंत्रण होणार या संपूर्ण प्रक्रियेवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा पातळीवरही विशेष समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. सहकार आयुक्त व निबंधक (सहकारी संस्था, पुणे) यांच्याकडे या योजनेच्या अंमलबजावणीची मध्यवर्ती जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांचे पदाधिकारी तसेच शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना या योजनेतून वगळण्यासाठीची पडताळणी ही समिती करणार आहे. अनेक पात्र शेतकऱ्यांची बँक कर्ज खाती काही तांत्रिक कारणांमुळे अद्याप लिंक झालेली नाहीत.

अशा सर्व तांत्रिक अडचणी दूर करून पात्र शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अचूक अपलोड करण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे.

## संपादकीय....

### पावसाचा जोर वाढणार!

देशभरात आणि महाराष्ट्रात दाखल झाल्यानंतर अचानक थबकलेल्या मान्सूनच्या प्रगतीसाठी आता पुन्हा एकदा अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे येत्या तीन दिवसांत मान्सून वाऱ्यांचा वेग वाढणार असून, २४ ते २५ जूनच्या सुमारास कोकण किनारपट्टीवर पावसाचा जोर लक्षणीयरीत्या वाढेल, असा अंदाज मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवला आहे. या बदलामुळे गेले काही दिवस उन्हाचा आणि उकाड्याचा तडाखा सहन करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. यंदा केरळमध्ये उशिराने दाखल झालेल्या मान्सूनने ६ जून रोजी तळकोकणात धडक दिली होती. त्यानंतर ८ जूनपर्यंत त्याने हर्णे आणि सोलापूरपर्यंत मजल मारली. मात्र, पुढील वाटचालीस पोषक वातावरण नसल्यामुळे मान्सूनची उत्तर सीमा गेल्या अनेक दिवसांपासून एकाच जागेवर स्थिर आहे. त्यामुळे जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पावसाने मोठी ओढ दिली असून, कोकण आणि गोव्यात १ ते १७ जून दरम्यान सरासरीच्या तुलनेत तब्बल ८१ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे.मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये पुढील काही दिवस या भागात हवामान मुख्यतः कोरडे राहण्याची शक्यता असून, २४ जूननंतरच पावसाचा जोर वाढेल. तर दक्षिण कोकणातील रत्नागिरी, रायगड आणि सिंधुदुर्गमध्ये २१ जूनपर्यंत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळतील. मात्र, सिंधुदुर्ग वगळता इतर भागात १९ जूनपर्यंत उष्ण आणि दमट वातावरण कायम राहील. विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि गुजरातच्या काही भागांत पुढील चार ते पाच दिवसांत हलक्या पावसाची शक्यता आहे. वादळी पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, दक्षिण भारतापासून उत्तर भारतापर्यंत मान्सून वारे आता वेग घेत आहेत. १८ जूनपासून उत्तर-पश्चिम भारताच्या दिशेने वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या राज्यांना मिळणार दिलासा पुढील ४ ते ५ दिवसांत तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार, छत्तीसगड आणि उत्तर प्रदेशच्या आणखी काही भागांत नैऋत्य मान्सूनच्या प्रगतीसाठी मार्ग मोकळा झाला आहे. तसेच उत्तर भारतातील दिल्ली, पंजाब आणि हरियाणा या राज्यांमध्येही ढगाळ वातावरणासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे, ज्यामुळे तेथील तापमानात घट होऊन तीव्र उष्णतेपासून नागरिकांची सुटका होईल. देशभरात पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे शेतकरी चिंतेत होते; मात्र आता हवामान प्रणाली पुन्हा सक्रिय झाल्याने पेरण्यांच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा असून सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाची वाढती ताकद; ऑपरेशन टायगर ठरले गेमचेंजर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेले ऑपरेशन टायगर अखेर यशस्वी झाल्याची चर्चा जोर धरत आहे.उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील सहा खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन केल्याने राज्यातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.या घडामोडींमुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.मंगळवारी रात्री घडलेल्या नाट्यमय घडामोडींमध्ये खासदार संजय जाधव,संजय देशमुख,नागेश पाटील आष्टीकर,ओमराजे निंबाळकर,भाऊसाहेब वाकचौरे आणि संजय दिना पाटील यांनी दिल्ली गाठून स्वतंत्र गट स्थापन करण्याची प्रक्रिया पूर्ण केल्याची माहिती समोर आली. लोकसभा अध्यक्षांनी या गटाला मान्यता दिल्याने या राजकीय घडामोडींना अधिकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये घेतलेली भूमिका ही केवळ सत्तेसाठी नसून, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या विचारांना न्याय देण्यासाठी असल्याचे ते सातत्याने सांगत आले आहेत.त्यानंतर अनेक आमदार आणि खासदारांनी शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला.आता या सहा खासदारांच्या निर्णयामुळे शिंदे यांच्या नेतृत्वावरील विश्वास आणखी दृढ झाल्याचे दिसून येत आहे.



राजकारणात विचार आणि नेतृत्व यांना मोठे महत्त्व असते.कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी ज्या नेतृत्वाकडून स्पष्ट भूमिका,विकासाची दिशा आणि संघटनात्मक बळ अपेक्षित करतात,त्या निकषांवर एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व प्रभावी ठरत असल्याचे समर्थकांचे मत आहे.केंद्रातील नेतृत्वासोबतचा समन्वय,महाराष्ट्रातील विकास प्रकल्पांना मिळालेली गती आणि जनसामान्यांच्या प्रश्नांवर घेतलेली भूमिका यामुळे शिंदे यांची राजकीय स्वीकारार्हता वाढल्याचेही बोलले जात आहे.या घडामोडी केवळ पक्षीय राजकारणापुरत्या मर्यादित नसून,महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात मानली जात आहेत. बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्व,विकास आणि जनतेशी थेट नाळ जोडणारे राजकारण पुढे नेण्याचा प्रयत्न उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करत असल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे,या घडामोडींना अधिक बळ देणारी बाब म्हणजे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने बोलावलेल्या महत्त्वाच्या बैठकीसाठी सर्व खासदारांना व्हिप बजावण्यात आला असतानाही संबंधित सहाही खासदार बैठकीला उपस्थित राहिले नाहीत.त्यामुळे ते उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वापासून दूर गेल्याचे संकेत आधीच मिळाले होते.त्यानंतर स्वतंत्र गट स्थापन करण्याच्या हालचालींना वेग आला आणि अखेर चित्र पूर्णपणे स्पष्ट झाले. खासदार संजय जाधव, संजय देशमुख,नागेश पाटील आष्टीकर,ओमराजे निंबाळकर,भाऊसाहेब वाकचौरे आणि संजय दिना पाटील यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे उद्धव ठाकरे यांना पुन्हा एकदा मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.लोकसभा अध्यक्षांकडून स्वतंत्र गटाला मान्यता मिळाल्यानंतर या निर्णयाला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले असून,शिवसेनेतील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल झाल्याचे स्पष्ट झाले आहे.या सर्व घडामोडींमुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाची ताकद,संघटनात्मक क्षमता आणि पक्षातील वाढता प्रभाव पुन्हा अधोरेखित झाला आहे.अनेक लोकप्रतिनिधी शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत असल्याचे चित्र दिसत असून, ऑपरेशन टायगर हे केवळ राजकीय समीकरण बदलणारे अभियान नसून महाराष्ट्राच्या राजकारणातील नव्या अध्यायाचे प्रतीक ठरत असल्याची चर्चा सध्या सर्वत्र सुरू आहे.



**– केतन भोज, घाटकोपर**



# सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांनी घेतला बार्टीच्या विविध योजनांचा आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्याच्या समाजकल्याण राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा दिनांक १७ जून २०२६ रोजी विधानभवन, पुणे येथील सभागृहात घेतला.

या आढावा बैठकीत बार्टी संस्थेच्यावतीने स्पर्धा परीक्षा, फिलोशीप, आयबीपीएस, पोलीस भरती, जेईई, तसेच कौशल्य विकास विभागाच्यावतीने अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना देण्यात येणारे प्रशिक्षण, शिष्यवृत्ती, आदींची माहिती घेतली.

तसेच मिसाळ यांनी बार्टीने विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात यावे आणि विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या नामवंत संस्थाची निवड करावी,असे निर्देश आढावा बैठकीत आधिका- यांना दिले. तसेच जात पडताळणी प्रक्रिया अधिकाधिक सुलभ कशी करता येईल व विद्यार्थ्यांना तात्काळ प्रमाणपत्र कसे देता येतील याबाबतही त्यांनी निर्देश दिले. प्रारंभी निबंधक डॉ.सुचिता शिंदे यांनी बार्टीचे सादरीकरण केले.

या आढावा बैठकीला समाजकल्याणच्या आयुक्त तथा बार्टीच्या प्रभारी महासंचालक श्रीमती दीपा मुधोळ -मुंडे, बार्टीच्या निबंधक डॉ सुचिता शिंदे, विभागप्रमुख रविंद्र कदम, डॉ बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण यांच्यासह समाजकल्याण व बार्टी संस्थेतील अधिकारी उपस्थित होते.

# 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर पशुपालकांनी चारा नियोजनाकडे विशेष लक्ष द्यावे : आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : जागतिक हवामान बदलाचा परिणाम म्हणून निर्माण होणाऱ्या 'एल निनो'च्या संभाव्य संकटामुळे आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परिस्थितीचा पशुधन व दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी राज्यातील सर्व पशुपालकांनी आतापासूनच सतर्क राहून चारा पिकांचे नियोजन करावे, असे आवाहन मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी केले आहे.

पशुपालकांना या संकटाचा सामना समर्थपणे करता यावा, यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुपालक व शेतकरी यांना पोषक व बहुउद्देशीय चारा पिकांची निवड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गाई व म्हशींच्या उत्तम आरोग्यासाठी आणि दूध उत्पादनात घट होऊ नये म्हणून पशुपालकांनी पोषक असणाऱ्या चारा पिकांची लागवड करावी. अशी पिके निवडावीत ज्यातून मुख्य शेतमाल (धान्य/उत्पादन) तर मिळेलच, सोबतीला जनावरांच्या पोषणासाठी दर्जेदार चाराही उपलब्ध होईल.

शेतकऱ्यांनी आपल्या शेताच्या बांधावर अथवा पडीक जमिनीवर येणारे नैसर्गिक गवत वाया न घालवता त्याचे योग्य जतन करावे. पावसाची ओढ किंवा टंचाईच्या संकट काळात हेच गवत जनावरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आधार ठरणार आहे. भविष्यातील संभाव्य टंचाई टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या उपलब्ध जमिनीवर मोठ्या प्रमाणावर चारा उत्पादनावर भर द्यावा. उत्पादित केलेला अतिरिक्त चारा 'मुरघास' किंवा सुक्या चाऱ्याच्या स्वरूपात साठवून ठेवावा, जेणेकरून जनावरांच्या खाद्याचा प्रश्न निर्माण होणार नाही.

पशुसंवर्धन विभागामार्फत 'एल निनो'च्या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी पशुपालक-शेतकरी बांधवांना विविध माध्यमातून मार्गदर्शन करण्यासाठी विभागाच्या वतीने नियोजन करण्यात येत आहे. या संभाव्य संकटकाळात पशुधनाची काळजी घेण्यासाठी पशुसंवर्धन विभाग सक्षम असून, कोणत्याही शंका तसेच अडचणी संदर्भात पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर नंबरवरुन माहिती व पशुवैद्यकीय सेवा प्राप्त करुन घ्याव्यात, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी अशी पिके घ्यावीत जी तीव्र टंचाईच्या काळात पशुखाद्य (चारा) म्हणूनही उपयुक्त ठरतील; तसेच चाऱ्याची नासाडी न करता त्याचा प्रभावी वापर व व्यवस्थापन करावे. त्याचबरोबर, खरीप आणि रब्बी हंगामातील चारा पिके साठवून ठेवण्यासाठी 'सायलेज' (silage) तंत्रज्ञानाचा वापर करावा; जेणेकरून फेब्रुवारी ते जून २०२७ या टंचाईच्या काळात त्याचा वापर करता येईल. एल निनोच्या सावटामुळे उद्भवणाऱ्या संभाव्य टंचाईचा फटका आपल्या पशुधनाला बसू नये, ही आपली प्राथमिकता असली पाहिजे. योग्य नियोजन, पोषक चारा पिकांची निवड व उपलब्ध चाऱ्याची साठवणूक करून आपण पशुधनाचे पोषण आणि आपले आर्थिक उत्पन्न दोन्ही सुरक्षित ठेवू शकतो. सर्व पशुपालकांनी या आवाहनाचा गांभीर्याने विचार करून तातडीने अंमलबजावणी करावी, ही विनंती.

**– डॉ. किरण पाटील, आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य**

# बोपगाव येथे 'खेत बचाओ अभियान' आणि 'एल निनो' बाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर प्रतिनिधी :डॉ. विनायक गायकवाड : पुरंदरः 'स्वस्थ मिट्टी, सशक्त किसान, समृद्ध भारत' या संकल्पनेवर आधारित 'खेत बचाओ अभियान' आणि 'एल निनो' च्या पार्श्वभूमीवर, तालुका कृषी अधिकारी (पुरंदर) श्री. श्रीधर चव्हाण व मंडळ कृषी अधिकारी (सासवड) श्री. रवींद्र खेसे यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे बोपगाव (ता. पुरंदर) येथे विशेष जनजागृती कार्यक्रम आणि शेती प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे नियोजन बोपगावचे सहाय्यक कृषी अधिकारी श्री. विजय जाधव यांनी केले होते. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना खरीप हंगाम पूर्वतयारी आणि पाणी व्यवस्थापनाबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि प्रमुख उपस्थिती पुढील प्रमाणे

भारतीय कृषी अनुसंधान परिषद (द्राक्ष संशोधन केंद्र): डॉ. ड.ऊ रामटेके, डॉ. मदनकर मॅडम व श्री. कांबळे (टी.ओ.) यांनी बदलत्या हवामानात शेती कशी करावी, यावर प्रकाश टाकला.

अखिल भारतीय कोरडवाहू फळपीक (सीताफळ व अंजीर) संशोधन केंद्र, जाधववाडी: डॉ. प्रदीप दळवे व डॉ. युवराज बालगुडे यांनी 'सीताफळ बहार व्यवस्थापना'बाबत सविस्तर माहिती दिली. तसेच 'एल निनो'ची पार्श्वभूमी, त्याचे शेतीवरील संभाव्य परिणाम व त्यावरील उपाययोजनांबाबत उपस्थित शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

कृषी विभागः सासवडचे उप कृषी अधिकारी श्री. गणेश जगताप आणि दिवे गावचे सहाय्यक कृषी अधिकारी श्री. कोंडीबा जरांडे यांनी खरीप पिकांची योग्य निवड, पाण्याचा वाजवी वापर आणि खतांचा संतुलित वापर कसा करावा, याचे तंत्रज्ञान समजावून सांगितले.

पाणी फाऊंडेशनः फाऊंडेशनचे मेंटॉर व उप कृषी अधिकारी श्री. कदम साहेब तसेच सहाय्यक कृषी अधिकारी श्री. अतुल हिंगणे यांनी पाणी बचतीचे महत्त्व पटवून दिले.

थेट प्रात्यक्षिकांद्वारे आधुनिक शेतीचे धडेः

केवळ मार्गदर्शनावर न थांबता, उपस्थित शेतकऱ्यांसाठी प्रत्यक्ष शेतावर खालील महत्त्वाच्या बाबींची प्रात्यक्षिके करून दाखवण्यात आली:

१. हुमणी अळी नियंत्रणः हुमणी अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी 'प्रकाश सापळा' (ङळसहीं ढीरि) कसा वापरावा, याचे थेट प्रात्यक्षिक दाखवले गेले.

२. आधुनिक पेरणी पद्धतः इइऋ (रुंद वरंबा सरी) आणि गादी वाफ्यावर 'टोकन यंत्राद्वारे' बियाणे टोकन करण्याचे तंत्र प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगण्यात आले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन कृषि विभाग, पाणी फाऊंडेशन, ग्रामपंचायत बोपगांव, राजलक्ष्मी, राजनंदिनी महिला बचत गट,कालभैरवनाथ आदेश पुरुष बचत गट व समस्त शेतकरी बंधू भगिनी यांनी केले होते.

# माळशिरस वाहन अपघात-जिल्हाधिकाऱ्यांकडून 'चौकशी समिती' गठीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : दिनांक १४ जून २०२६ रोजी सोलापूर जिल्ह्यातील म्हसवड येथील श्री सिद्धनाथाच्या दर्शनाहून परतत असलेल्या भाविकांच्या पिकअप वाहनाला माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी परिसरात भीषण अपघात झाला. हे वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या उघड्या विहिरीत कोसळल्याने ८ निष्पाप नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अत्यंत गंभीर आणि वेदनादायी घटनेची दखल घेत जिल्हाधिकारी तथा जिल्हा रस्ते सुरक्षा समितीचे अध्यक्ष यांनी या अपघाताच्या सखोल चौकशीसाठी 'विशेष चौकशी समिती गठीत केली आहे.

तसेच, भविष्यात अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी जिल्ह्यातील रस्त्यांच्या कडेला असलेल्या, संरक्षक भिंत नसलेल्या धोकादायक व उघड्या विहिरींचे तात्काळ सर्वेक्षण करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी 'तालुकास्तरीय समिती देखील गठीत करण्यात आली आहे.

**अपघाताच्या चौकशीसाठी विशेष समितीः**

तांदुळवाडी येथील विहीर अपघात नेमका कशामुळे झाला, यामध्ये रस्ते रचनेतील त्रुटी, वाहनाचा वेग की अन्य काही तांत्रिक कारणे कारणीभूत होती, याचा सखोल तपास ही समिती करणार आहे. ही समिती आपला अहवाल जिल्हा रस्ते सुरक्षा समितीला सादर करेल, ज्याच्या आधारे पुढील कायदेशीर व सुधारात्मक कारवाई केली जाईल.

धोकादायक विहिरींच्या सर्वेक्षणासाठी तालुकास्तरीय समितीः

जिल्ह्यातील महामार्ग, राज्य महामार्ग आणि ग्रामीण रस्त्यांच्या कडेला अनेक विहिरींना संरक्षक भिंती (कठडे) किंवा जाळ्या नसल्याने त्या अत्यंत धोकादायक बनल्या आहेत. यावर तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी तालुका पातळीवर समिती गठीत करण्यात आली असून, त्यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेतः

तात्काळ सर्वेक्षणः तालुक्यातील सर्व रस्त्यांच्या कडेला असलेल्या आणि संरक्षक भिंत नसलेल्या उघड्या, धोकादायक विहिरीचा शोध घेऊन त्यांची यादी तयार करणे. प्रतिबंधात्मक उपाययोजनाः संबंधित विहीर मालकांना किंवा प्राधिकरणाला तात्काळ संरक्षक भिंत (झरीरशिीं थरश्रश्र) बांधणे, लोखंडी जाळ्या बसवणे किंवा रिफ्लेक्टर्स/धोकादायक फलक लावण्याचे आदेश देणे. कडक अंमलबजावणी व कारवाई: आदेश देऊनही विहिरी सुरक्षित न करणाऱ्या निष्काळजी मालमत्ता धारकांवर कायदेशीर कारवाई करणे. माळशिरस येथील अपघात अत्यंत दुर्दैवी आहे. मृत नागरिकांच्या कुटुंबांप्रती आम्ही संवेदना व्यक्त करतो. या घटनेची निष्पक्ष चौकशी केली जाईल. तसेच, जिल्ह्यातील एकही उघडी विहीर रस्त्याच्या कडेला असुरक्षित राहणार नाही, यासाठी तालुकास्तरीय यंत्रणेला युद्धपातळीवर सर्वेक्षण करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत. नागरिकांच्या जिवाची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता आहे. अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी, अभिजीत पाटील यांनी दिली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मृग नक्षत्राच्या हुलकावणीने शेतकरी राजाचे डोळे आभाळाकडे : खरिपाच्या पेरण्या कोळंबल्या

## सोशल मीडियावर सुद्धा पड रे पाण्या पडरे पाण्या हे गीत दररोज वायरल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : एप्रिल मे मधील २०२६ च्या कडक उन्हाच्या तडाख्याने कासावीस झालेली जनता आणि शेतकरी मृग नक्षत्राची डोळ्यात तेल घालून वाट पाहत होते. शेवटी दि. ८ जूनला मृग नक्षत्राची सुरुवात ही कोरडीच झाली. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांच्या व जनतेच्या अशा नी अपेक्षा भंग झाल्या.आज तरी पाऊस पडेल, मृग नक्षत्र हजरी लावेल या अपेक्षेने शेतकरी राजाचे डोळे दिवसेंदिवस आभाळाकडे लागलेले आहेत. पण मृग नक्षत्रातील गेले आठ दिवस कोरडेच गेल्याने खरीप हंगामातील पिकांची पेरणी वेळेत होते की नाही ही चिंता आता शेतकऱ्यांमध्ये वाढत आहे. त्यामुळे सोशल मीडियावर सुद्धा पड रे पाण्या पडरे पाण्या हे गीत दररोज वायरल होत असताना दिसत आहे.

**एकंदरीत पावसाची वाट सगळेच पाहत असताना**

दिसत आहेत.गतवर्षाच्या तुलनेत यावर्षी अवकाळी पाऊस अर्थात रोहिणी नक्षत्र नक्षत्रातील पाऊस कमी प्रमाणात झाला. त्यात मृग नक्षत्र अद्याप कोरडेच जात आहे त्यामुळे खरीप हंगामातील पिकाची पेरणी करण्याच्या तयारीत असलेल्या शेतकऱ्यांना महागडे बी बियाणे खरेदी करून पावसाची वाट पहात बसण्याची वेळ आली आहे.

तर सर्वसामान्य शेतकरी महागडी बी बियाणे खत फवारणीचे औषध खरेदी करायचे की नाही अशा द्विधा मनस्थितीत आहेत. गतवर्षी खरीप हंगामातील पेरण्या वेळेत झाल्या होत्या. तर सरत्या पावसाने रौद्ररूप धारण केल्याने रब्बी हंगामातील पेरणी पुढे गेली होती. त्यामुळे ज्वारीच्या पिकावर विपरीत परिणाम झाला होता.तर खरीप हंगामातील पिकाचे काढणी अभावी नुकसान झाले होते. वरून राजाच्या अशा लहरीपणामुळे अनेक प्रश्न जनतेसमोर निर्माण झाले आहेत.

मोठ्या शहरांना पिण्याचे पाणीपुरवठा करणारी धरणातील, तलावातील पाणी मोठ्या प्रमाणात कमी होताना दिसत आहे.त्यामुळे अनेक शहरावर पाणी कपातीची वेळ येऊन ठेपली आहे.तुळजापूर तालुक्यातील तुळजापूर नळदुर्ग व अंणदूर या मोठ्या शहरांना पाणीपुरवठा करणारे नळदुर्ग येथील एकमेव बोरीधरण आहे. या धरणाचेही पाणी आता मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. त्यात नळदुर्ग येथील उच्चस्तरीय बंधारा देखील कोरडा होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे सध्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये उभे असलेले उसाचे पीक कसे जगवावे व खरीप हंगामातील पिकासाठी मशागत करून ठेवलेल्या काळ्या आईची ओटी कसी भरयची असे अनेक प्रश्न पडलेले आहेत.

खरीप हंगामातील प्रामुख्याने घेतली जाणारे पिके म्हणजे सोयाबीन मूग उडीद तुर बाजरी वगैरे पिकांची पेरणी वेळेत नाही झाली शेतीउत्पन्नात घट होऊन शेतकरी आर्थिक आडचणीत येवू शकतो.या चिंतेत शेतकरी असतानाच शेतकऱ्याची पगार श्रावण बाळ,संजय गांधी,इंदिरा गांधी,लाडकी बहिण योजनेतील लाभार्थ्यांना मिळणारे मानधन

डीबीट, झूलवगेरे कारण पुढे करून गेल्या सहा महिन्यापासून सरकारने दिले नाही.पाऊस न आल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील कामे थांबली आहेत त्यामुळे भूमिहीन शेतमजुरांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता आहे. तसेच पाण्याअभावी बांधकामे खोळंबलेली आहेत त्यामुळे बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटुंबीयांना मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. भूमिहीन शेतमजूर बांधकाम कामगार यांच्या मुला मुलींचे शैक्षणिक प्रवेश आर्थिक अडचणीमुळे कसे घेणार, त्यांचे शैक्षणिक कसे पूर्ण करायचे या चिंतेत गोर गरीब कुटुंबातील पालक आहेत.जर वेळेत पाऊस नाही आला तर सत्ताधारी सरकारला गोरगरीब जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी व किमान पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे यात शंका नाही. तेव्हा शेतकऱ्यांच्या शेतमजुरांच्या बांधकामकारांच्या आर्थिक अडचणीचा विचार करून सरकारने लाभार्थी श्रावण बाळ



संजय गांधी इंदिरा गांधी योजनेतील लाभार्थ्यांचे मानधन जाचक अटी कमी करून त्वरित वाटप करावे. अनेक पात्र लाभार्थी रेशन कार्डधारकांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभ मिळत नाही. तुळजापूर तालुक्यातील अनेक रेशन कार्डधारकांनी अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट करून आमच्या कुटुंबाला अन्नधान्य पुरवठा सुरू करावा यासाठी रीतसर अर्ज केलेले आहेत परंतु गेल्या एक वर्षापासून ते अर्ज संबंधित पुरवठा विभागात धूळ खात पडलेले आहेत याबाबत विचारले असता सरकारकडे धान्य पुरवठा कमी आहे. असे बेजबाबदार उत्तर दिले जाते त्यामुळे अशा लाभार्थी कुटुंबांना महागाईच्या आणि पाणीटंचाईच्या काळात सरकारने लक्ष द्यावे अशीही मागणी जोर धरत आहे.



# आषाढी यात्रा कालावधित कलम १६३ चे घोषणापत्र जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : मा. पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांनी त्यांचेकडील पत्र क्र. जिविशा/आषाढीवारी / २०२६-४५९१४८९ दि.०५ जून २०२६ अन्वये श्री क्षेत्र पंढरपूर येथे आषाढीवारी यात्रा दि. १९जुलै २०२६ ते दि.२९ जुलै २०२६ याकालावधीत भरत आहे. यात्रेचा मुख्य दिवस दि.२४ जुलै २०२६ दशमी, दि. २५ जुलै २०२६ देवशयनी आषाढी एकादशी व दि. २९ जुलै २०२६ पौर्णिमा आहे. आषाढीवारी कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात वारकरी / भाविक लोक श्री क्षेत्र पंढरपूर येथे येत असतात.

कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात वारकरी / भाविक लोक श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येत असतात तसेच देशात, राज्यात व महत्त्वाच्या शहरे, धार्मिक व पर्यटन स्थळे इ. ठिकाणी दहशतवादी कारवायात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. दहशतवादी कारवाया करणारे दहशतवादी हे स्थानिक लोकात मिसळुन तात्पुरत्या स्वरुपात वास्तव्य करुन घातपाती कारवायांना अंतिम रुप देतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणातं मानवी जिवीताचे व मालमत्तेचे नुकसान होत असून त्याचबरोबर अशा घटनांमुळे जनमाणसात घबराटीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणाऱ्या घटना वारंवार घडत आहेत. सदर दहशतवादी कारवायामध्ये दहशतवादी हे जुनी वाहने, तसेच इतर वस्तुंचा वापर केल्याचे यापुर्वी आढळले आहे. तसेच ते सदर कारवायाच्या वेळी रुम / फ्लॅट / लॉज भाड्याने घेवून राहतात. मस्जिद, चर्च, धर्मशाळा येथे आश्रय घेतात किंवा सदरची जागा विकत किंवा लिजने घेतात. त्यासाठी ते स्थानिक ओळख म्हणून प्रॉपर्टी डिलर / ब्रोकर / एजंन्ट जुने वाहन खरेदी-विक्रि करणारे दुकानदार यांची मदत घेतात.

जिल्ह्यातील नविन राहण्यासाठी येणारे व्यक्ती, यांची माहिती असणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून सोलापूर जिल्ह्यातील आपल्या स्थळ सिमा हद्दीत जी-जी व्यक्ती नव्याने राहण्यासाठी येईल त्या व्यक्तीस व जे कोणी अशा व्यक्तीस राहण्यास जागा उपलब्ध करुन देईल असे घरमालक, प्रॉपर्टी डिलर, ब्रोकर, एजंन्ट, मस्जिद, चर्च, धर्मशाळा इत्यादीचे विश्वस्त यांना अशा अनोळखी नविन राहावयास आलेल्या व्यक्तींची त्यांच्या वास्तव्यासंबंधीची संपूर्ण माहीती न चुकता तो राहावायास आल्यानंतर किंवा विचारपुस केल्यावर लगेच संबंधीत पोलीस ठाणेला देणे गरजेचे आहे. जेणेकरुन भविष्यात होणाऱ्या दहशतवादी कारवाईस, गुन्ह्यास प्रतिबंध होवु शकतो व सार्वजनिक कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अबाधित राहण्यास सहाय्य होईल. तसेच लोकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होवुन सार्वजनिक शांतता वाढीस लागण्यास बळ मिळेल. तरी वरील नमुद सर्व परिस्थितीचा विचार करुन याकरीता सोलापूर ग्रामीण जिल्हयात व सर्व नगरपालिका हद्दीत दिनांक-०८ जून २०२६ पासून पुढे ६० दिवस कालावधीत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे घोषणापत्र लागू होणेस विनंती केली आहे. आणि ज्याअर्थी असा आदेश काढण्यापूर्वी जिल्हयातील सर्व लॉज, हॉटेल, फ्लॅट, दुकाने, घर / जागा धार्मिक स्थळांचे विश्वस्त वा काळजीवाहक, प्रॉपर्टी डिलर, ब्रोकर, एजंट, जुने घर खरेदी विक्री करणारे व्यक्ती व संस्था तसेच भाडयाने घर देणारे व्यक्ती व संस्था / घर मालकांना नोटीस देऊन त्यांची बाजू ऐकणे शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढणे आवश्यक असल्याने अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांच्या भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन आदेश दिला आहे की, सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व लॉज, हॉटेल, फ्लॅट, दुकाने, घरमालक, प्रॉपर्टी डिलर / ब्रोकर / एजंट, जुने घर विक्री-खरेदी करणारे व्यक्ती व संस्था, भाडयाने घर देणारे व्यक्ती व संस्था तसेच धार्मिक स्थळांचे विश्वस्त व काळजीवाहक यांना खालील कृत्यांना बंदी घालत आहे. आषाढीवारी कालावधीत फ्लॅट, लॉज, मठ, धर्मशाळा, चर्च, मशिद, मंदिर व खाजगी निवासस्थाने या ठिकाणी अनोळखी अथवा संशयित इसमास त्याची ओळख पटवल्याशिवाय राहण्यास परवानगी देवु नये. भाडेकरुकडून रहिवाशी व ओळख असलेला पुरावा इत्यादी कागदपत्रांच्या छायांकीत प्रती घ्याव्यात. आषाढोवारी कालावधीत स्फोटक पदार्थ, बार उडणारे पदार्थ सोबत बाळगू नये. तसेच गॅस, केरोसीन, डिझेल, पेट्रोल याचा वापर अत्यंत काळजीपुर्वक करुन सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. हा आदेश हा दिनांक-०८ जुन २०२६ पासुन पुढे ६० दिवस सोलापूर जिल्हयाचे ग्रामीण हद्दीत (पोलीस आयुक्तालय हद वगळून) व सर्व नगरपालिका हद्दीत लागू राहील. असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिले आहेत.

## शहीद जवान आप्पासाहेब काटे स्मृतीस्थळ लोकार्पण सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : शहीद जवान अप्पासाहेब काटे स्मृतीस्थळ लोकार्पण व पुण्यस्मरण सोहळा बुधवार दि.२४ जून २०२६ रोजी संपन्न होणार असुन, या सोहळ्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर मेजर मिलिंद देवदत्त तुंगार(नि) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांचे सोबत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे कर्मचारी श्री बाळासाहे खराडे, कल्याण संघटक हे उपस्थित राहणार असून, या कार्यक्रमाध्ये करमाळा तालुक्यातील सर्व माजी सैनिक व त्यांच्या विधवा यांच्या आडीआडचणी सोडवल्या जातील. तरी जास्तीत जास्त माजी सैनिक व विधवा यांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार (नि) यांनी केले आहे.

# आषाढी यात्रा कालावधीत ड्रोन प्रतिबंधित क्षेत्र घोषीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांचेकडील पत्र क्र. दि.०५ जून २०२६ रोजीच्या पत्राअन्वये उपरोक्त विषयास अनुसरून सादर की, श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आपाढीवारी यात्रा दि.१९ जूलै २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत संपन्न होत आहे. आषाढीवारी यात्रेचा मुख्य दिवस दि.२४ जुलै २०२६ दशमी, दि. २५ जुलै २०२६ देवशयनी आषाढी एकादशी व दि. २९ जुलै २०२६ पौर्णिमा आहे. आषाढीवारी यात्रा कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक लोक श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येत असतात. तसेच आगामी आषाढीवारी यात्रा कालावधीमध्ये दहशतवादी संघटना जसे की, जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तैयबा, हिजबुल मुजाहीद्दीन व इतर संघटनाकडून त्यांचे स्लीपर सेल सक्रीय केले जाण्याची शक्यता आहे. भारत-पाकिस्तान या देशांमध्ये तणावाचे दरम्यान ड्रोनचा मोठ्या प्रमाणात वापर केल्याचे दिसून आले आहे. दहशतवादी कारवाया करणारे दहशतवादी हे स्थानिक लोकात मिसळुन तात्पुरत्या स्वरुपात वास्तव्य करुन आगामी उत्सव कालावधीमध्ये ड्रोनद्वारे घातपाती कृत्य करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मानवी जिवीताचे व मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर अशा घटनांमुळे जनमाणसामध्ये घबराटीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. दहशतवादी कारवायामध्ये दहशतवादी हे आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे ड्रोनचा वापर करीत आहेत.

ज्याअर्थी सोलापूर जिल्हयातील आपल्या स्थळसिमा हद्दीतील सर्व मर्मस्थळे व महत्वाचे धार्मिक स्थळे श्री. विठ्ठल रूक्मीणी मंदिर, पंढरपूर ,श्री. स्वामी समर्थ मंदिर, अक्कलकोट तसेच पालखी मार्ग यांचे सुरक्षेच्या दृष्टीने सदर ठिकाणी ड्रोन उडविण्यास परवानगी देण्यात येवू नये. जेणेकरून भविष्यात होणाऱ्या एखाद्या दहशतवादी कारवाईस, गुन्हयास प्रतिबंध होवू शकतो व सार्वजनिक कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अबाधित राहण्यास मदत होईल. तसेच लोकामध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होवून सार्वजनिक शांतता वाढीस लागण्यास बळ मिळेल.

वर नमुद सर्व परिस्थितीचा विचार करून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार घोषणापत्र काढून संबंधित पोलीस ठाणे हद्दीतील सर्व मर्मस्थळे, महत्वाचे धार्मिक स्थळे, पालखी मार्ग यांचे सुरक्षेच्या दृष्टीने सदर ठिकाणी ड्रोन प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषणापत्र जाहिर करण्यात यावे. तसेच जिल्हयातील ड्रोन परवाना धारक वे चालक यांनी त्यांचेकडील ड्रोनची माहिती संबंधित पोलीस ठाणेला देणे बंधनकारक करणेबाबत आपले कार्यालयाकडून सोलापूर जिल्हयाचे ग्रामीण हद्दीत व सर्व नगरपालिका हद्दीत लागू करण्यात यावे. सदर घोषणापत्र दिनांक- ०८जून २०२६ रोजी पासून पुढे ६० दिवस लागू करण्याबाबतचे आदेश काढणे व या धार्मिक स्थळी येणाऱ्या सर्व पालखी मार्गावर टि.व्हि. चॅनल्स, खाजगी व्यक्ती, संस्था तसेच पालखी सोहळ्याचे छायाचित्रण करणारे यांना नोटीस देऊन त्यांची वाजू ऐकणे शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढण्यात येत आहेत.

सोलापूर ग्रामीण हद्दीत (पोलीस आयुक्तालय हद वगळून) व सर्व नगरपालिका हद्दीत दि. ०८जून २०२६ रोजी पासून पुढे ६० दिवस या कालावधीत सोलापूर जिल्हयातसर्व मर्मस्थळे, महत्वाचे धार्मिक स्थळे श्री. विठ्ठल-रुक्मीणी मंदिर, पंढरपूर, श्री. स्वामी समर्थ मंदिर, अक्कलकोट येथे ड्रोन उडविण्यास बंदी चे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिले आहेत.

**जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप**

**उपक्रमाचे ग्रामस्थ व विद्यार्थ्यांकडून स्वागत**

# सरपंच वनिता सुरवसे यांच्या वाढदिवसानिमित्त सिद्धार्थ सोशल फौंडेशनचा सामाजिक उपक्रम







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सामाजिक बांधिलकी जपत आणि शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने गोगांवच्या लोकप्रिय सरपंच सौ. वनिता मधुकर सुरवसे यांच्या वाढदिवसानिमित्त सिद्धार्थ सोशल फौंडेशनच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गोगांव येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे ग्रामस्थ व विद्यार्थ्यांकडून स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप हे होते. यावेळी केंद्रप्रमुख अशोक पोमाजी, मुख्याध्यापक पुंडलिक वाघमारे, माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष सूर्यकांत जिरगे, कल्याणराव बिराजदार, यमाजी सर, शाम बाबर तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरणबसप्पा मुळजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षण हीच प्रगतीची गुरुकिल्ली असून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमात बोलताना उपसरपंच तथा सिद्धार्थ सोशल फौंडेशनचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे म्हणाले, समाजातील वंचित, गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अशा सामाजिक उपक्रमांची आवश्यकता आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या सरपंच वनिता सुरवसे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

ते पुढे म्हणाले की, सौ. वनिता सुरवसे यांनी आपल्या कार्यकर्तृत्व, दूरदृष्टी आणि लोकाभिमुख नेतृत्वाच्या जोरावर गोगांवच्या विकासाला नवी दिशा दिली आहे. त्यांनी गावातील पायाभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा तसेच विविध सामाजिक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

गावातील सिमेंट काँक्रिट रस्ते, बंदिस्त गटारे, पेव्हर ब्लॉक, सभामंडप, सांस्कृतिक भवन, जलजीवन मिशन, ग्रामपंचायत इमारत तसेच श्री कल्लेश्वर मंदिर विकास यांसारख्या अनेक विकासकामांमधून त्यांच्या कार्याची छाप स्पष्टपणे दिसून येते. सामाजिक समता आणि लोककल्याणासाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी यावेळी नमूद केले.

राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू म्हणून ओळख असलेल्या वनिता सुरवसे यांनी प्रशासनातही प्रभावी नेतृत्व करत महिला सक्षमीकरणाचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली गोगांव विकासाच्या नव्या उंचीवर झेपावत असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भोसले मॅडम , सुधीर जगताप, विजयकुमार गायकवाड. सचिन गायकवाड, सागर वामने. यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महादेव सोनकवडे यांनी केले.

# धाराशिव जिल्हा परिषदेच्या शिक्षण व्यवस्थेवर काही शाळेवर प्रश्नचिन्ह निर्माण होतोय



## शिक्षण विभागाने विद्यार्थांची गुणवत्ता चाचणी करा नाहीतर आयुक्त तुकाराम मुंढेना आठवण करा ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. शिक्षण व्यवस्थे बाबत अनेक पालक, विद्यार्थी आणि नागरिक चिंता व्यक्त करतात. शैक्षणिक दर्जा घसरणे, विद्यार्थ्यांकडे पुरेसे लक्ष न देणे, अध्यापनातील त्रुटी, शिस्तीचा अभाव, तसेच गैर प्रकारां बाबत तक्रारी आल्यास त्यांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या शाळा मुख्य खुप चांगल्या शाळा आहेत या शाळे मध्ये पारदर्शक प्रशासनासाठी शिक्षक कमी पडतात धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सर्वच शाळा तशा नाहीत पण काही शाळा सुद्धा गुणवत्ता धारक आहेत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा व सन्माननीय पदाधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शिक्षण विभागांमध्ये लक्ष घालण्याची गरज आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळेवर शिस्त व नियमाचे पालन केल्याचे दिसुन येत नाहीत गैर प्रकारांवर शिक्षण विभागाच्या वरिष्ठानी कारवाई करण्याची भूमिका घेतली पाहिजे अलीकडे अन्न व औषध प्रशासन विभागातही महाराष्ट्राचे धडाकेबाज ख ड अधिकारी तुकाराम मुंढे यांनी कठोर कारवाई केली आहे.

कोणत्याही विशिष्ट शिक्षक, शाळा किंवा शिक्षण विभागाच्या शिक्षण अधिकाऱ्यांनी अधिकृत पणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांची चौकशी करणे आजच्या काळाची गरज आहे शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी पुढील बाबींवर भर देणे गरजेचे आहे.

शिक्षकांची नियमित उपस्थिती आणि जबाबदारी निश्चित करणे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यकतेनुसार बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत तरच विद्यार्थांच्या गुणवत्तेचे सातत्याने मूल्यमापन शाळां मधील गैर प्रकारांवर वचक बसेल आणि जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागावर पालकांचा विश्वास वाढेल आणि संवाद ही वाढेल ग्रामीण आणि जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक साधन सामग्री वाढवणे विद्यार्थी केंद्रित अध्यापन पद्धतींचा अवलंब करणे

धाराशिव शिक्षण विभागाने गुणवत्ता, पारदर्शकता आणि शिस्त यांना प्राधान्य दिल्यास शिक्षणाचा दर्जा निश्चितच उंचावू शकतो.

जिल्हा परिषदेच्या सर्रास शिक्षकांचे मुले जिल्हा परिषदेची शाळा सोडून इतर खाजगी शाळेत प्रवेश घेतात तेही पर जिल्ह्यात मग शाळा कशी सुधारणार

गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन त्यांची प्रेरणा

त्यांचा आदर्श हे समोर आले पाहिजे आसे आसेल तरच शिक्षण विभाग नक्कीच पुढे जाणार

काही शाळांत जर दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत कॉपीचा सुळसुळाट होतो या मुख्य विषयावर अंकुश कोणाचा मग या बाबत शिक्षण विभागाने कसुन चौकाशी करा विद्यार्थीची स्वतः चाचणी घ्यावी कारण विद्यार्थांच्या गुणवत्ते वरून शिक्षकांची गुणवत्ता कळते.

जिल्हा परिषदेच्या शाळा ह्या कॉपी मुक्त झाल्या पाहिजे मी ही बातमी अनुभवातून लिहितोय नाहीतर आम्हाला महाराष्ट्राचे धडाकेबाज कर्तव्यदक्ष ख ड तुकाराम मुंढे यांना आठवण करावे लागणार यात काय शंका नाही.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या प्रा. वनिता जाधव-बागल यांना पीएच.डी. प्राप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागात कार्यरत असलेल्या प्रा.वनिता ज्ञानदेव जाधव-बागल यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच. डी. प्राप्त झाली आहे. डॉ. वनिता जाधव यांनी अभियांत्रिकी मधील कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागात 'अॅक्युरेट टेक्निकज् फॉर अर्ली स्टेज लंग कॅन्सर डिटेक्शन युजिंग इंटेलिजंट लर्निंग अप्रोच' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता. या यशाबद्धल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

वडगाव (पुणे) येथील एस.के. एन. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे डॉ. ललित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या प्रेरणेने व पती डॉ.शेखर बागल यांच्या सहकार्याने प्रा. वनिता जाधव यांनी ही पीएच.डी. पूर्ण केली आहे. त्यांनी 'इमेज प्रोसेसिंग विथ डीप लर्निंग' या क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे. या संशोधनात त्यांनी नवीन डीप लर्निंग मेथड्स फॉर मेडिकल इमेज प्रोसेसिंगवर काम केले आहे. प्रा. वनिता जाधव यांनी पीएच.डी. दरम्यान ३ संशोधन पेपर प्रतिष्ठित नियतकालिकांमध्ये प्रकाशित केले आहेत आणि २ पेपर्स आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादर केले आहेत तसेच आ ं त र र ा ष्ट् ्र ी य जर्नल्स मधून त्यांचे शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

**स्वेरीचे संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे सर हे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण व संशोधनासाठी नेहमीच प्रेरणा व प्रोत्साहन देत असतात. आज स्वेरीतील सुमारे ४५ प्राध्यापकांनी आय. आय.टी., एन.आय.टी., आय. आय. एससी. अशा विविध प्रख्यात संस्थामधून पीएच.डी. पूर्ण केली असून सुमारे ६० प्राध्यापक पीएच. डी. पूर्ण करण्याच्या प्रक्रियेमध्ये आहेत. डॉ. बी. पी. रोंगे सर यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत तब्बल १६ पेटंट्स प्रकाशित केले आहेत तसेच सुमारे ६० विद्यार्थी स्वतः पेटंट्स फाइल करण्याच्या प्रक्रियेत आहेत. या बाबी स्वेरीच्या संशोधन परंपरेचे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रतीक आहेत.**



प्रा. वनिता जाधव यांचे हे यश केवळ त्यांच्या समर्पण आणि कौशल्याचे प्रतीक नाही, तर स्वेरी महाविद्यालय, पंढरपूरलाही गौरवान्वित करणारे असे आहे. डॉ. जाधव ह्या स्वेरी संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागामध्ये गेल्या २० वर्षांपासून उत्कृष्टपणे ज्ञानदान करत आहेत. पीएच.डी. प्राप्त झाल्याबद्दल डॉ. वनिता जाधव यांचा उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, इतर विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, संस्थेअंतर्गत असणाऱ्या बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, इंजिनिअरींगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. प्राजक्ता सातारकर, डॉ. स्वाती पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी डॉ. वनिता जाधव यांचे अभिनंदन केले आहे.

# होळकरवाडी ते बोपगांव घाटामध्ये तरुण-तरुणींना लुटणारे तीन दरोडेखोरांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : होळकर वाडी ते बोपगांव घाटाच्या डोंगरमाथ्यावर सिटी पॉईट परिसरामध्ये तरुण-तरुणीवर हाताने आणि काठ्याने हल्ला करून त्यांना लुटणाऱ्या तीन आरोपींच्या मुस्क्या फुरसुंगी पोलिसांनी अवघ्या बारा तासाच्या आत आवळल्या.

घाटाच्या सिटी पॉईंट परिसरामध्ये तरुण तरुणी वर लाठ्या काठ्या आणि दगडाने हाणामारी करून त्यांना लुटणाऱ्या तीन आरोपीच्या मुसख्या आवळाल्या. फुरसुंगी पोलिसांनी अवध्या बारा तासाच्या आवळाल्या १) प्रतीक दिलीप फडतरे यय २२धंदा रस वंती राहणार बोपगाव तालुका पुरंदर, २)ओंकार सुनील फडतरे वय २७ धंदा शेती राहणार बोपगांव ता. पुरंदर ३)गणेश नवनाथ कामठे वय २७ धंदा शेती राहणार चांबळी चिली वस्ती तालुका पुरंदर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत, आरोपीकडून पोलिसांनी स्प्लेंडर मोटरसायकल आणि चोरलेले मोबाईल असा एकूण ५५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. फुरसुंगी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मंगळवारी दि.११ रोजी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास फिर्यादी तरुण व त्याचे मित्र आकाश, आणि एक मैत्रीण दोन एंक्टिवा दुचाकी वरून होळकर वाडी ते बोपगांव घाटाच्या हद्दीतील सिटी पॉईंट जवळ निसर्ग पाहण्यासाठी आले होते.

सत्यात यावेळी तरुण-तरुणींना काठ्यांनी आणि रस्त्यावरील दगडाने बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली, आरोपींनी फिर्यादी आणि त्याचा मित्र आकाश यांच्याकडून १५,००० रुपये किमतीचे दोन महागडे मोबाईल हँडसेट आणि ऑनलाईन जबरदस्तीने १२,३०० रुपयाची रोख रकम असा एकूण मुद्देमाल धाक दाखवून लुटला आणि अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले होते, या घटनेची फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष् पोलीस निरीक्षक अमोल गोरे यांनी तात्काळ गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस पथकाला शोध घेण्याच्या सूचना दिल्या, दरम्यान त्यानुसार पोलीस अंमलदार हेमंत कामथे आणि सागर बने यांना गोपनीय बातमीदारांनी दिलेल्या माहितीनुसार तसेच हवालदार यांनी आरोपीच्या मोबाईल नंबरचे तांत्रिक विश्लेषण केले असता है तिघेही कानिफनाथमळा बोपगांव येथे लपून बसल्याचे निष्पन्न झाले. वरिष्टांच्या आदेशानुसार फुरसुंगी पोलिसांच्या पथकाने कानिफनाथ मळा परिसरात तळ दिला आणि संशयहांना दाब्यात घेतले पोलिस खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली, पोलीस ठाण्यतील पोलीस उपनिरीक्षक बापू खंदारे सहाय्यक पोलीस फौजदार पोलीस हवालदार नितीन गायकवाड, श्रीनाथ जाधव, सागर बरवे, हेमंत कामथे, , योगेश आणि गणेश शिंदे यांनी केली आहे. तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद पवार है पुढील तपास करीत आहेत.

**फुरसुंगी पोलिसांची उत्तम कामगिरी.**

# एन विभागातील डीप क्लिनिंग ड्राईव्ह योजनेवर प्रश्नचिन्ह; तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागातील घन कचरा व्यवस्थापन विभागाच्या अखत्यारीत राबविण्यात येणाऱ्या डीप क्लिनिंग ड्राईव्हच्या कामांबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विक्रोळी पार्कसाईट, राहूल नगर, रामनगर, डकलाईन, सेवा नगर, भीम नगर या भागात नियमित व प्रभावीपणे डीप क्लिनिंग ड्राईव्हची कामे होत नसल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून वारंवार करण्यात येत असून,त्याकडे मनपा एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे.स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक ठिकाणी रस्ते व सार्वजनिक परिसरांची स्वच्छता समाधानकारक पद्धतीने होत नसल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. डीप क्लिनिंग ड्राईव्हसाठी मुंबई महानगरपालिकेकडून मोठ्या प्रमाणात निधी खर्च करूनही प्रत्यक्षात अपेक्षित दर्जाची कामे होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.विशेष म्हणजे, संबंधित संस्थाचालक कंत्राटदारांकडून कामांमध्ये हलगर्जीपणा होत असल्याचे सांगितले जात असतानाही त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संबंधित प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. काही नागरिकांनी अधिकाऱ्यांना कंत्राटदार संस्था चालकांकडून कथित आर्थिक लाभ किंवा टक्केवारी मिळत असल्याने कारवाई होत नसल्याचा गंभीर आरोप केला आहे. नागरिकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच डीप क्लिनिंग ड्राईव्ह कामांची स्वतंत्र तपासणी करावी, अशी मागणी केली आहे. याबाबत मनपा प्रशासनाची भूमिका काय असणार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होणार का,याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# बार्टी संस्थेमार्फत यु.पी.एस.सी. भारतीय वनसेवा मुख्य परीक्षा २०२६ साठी आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत यु.पी.एस.सी. भारतीय वनसेवा मुख्य परीक्षा २०२६ (UPSC Forest - Mains Examination २०२६) या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. ५०,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

दि. १५ जून २०२६ रोजी संघ लोकसेवा आयोगाने भारतीय वनसेवा पूर्व परीक्षेचा निकाल घोषित केला आहे. सदर निकालानुसार भारतीय वनसेवा मुख्य परीक्षेस (चरळपी ञ्शिर्शीं) पात्र असलेल्या उमेदवारांना एकरकमी रक्कम रु. ५०,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थेमार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in NOTICE BORD UPSC Forest Service - Mains Examination 2026 Financial assistance Scheme येथे भेट द्यावी.

## कळंब येथे दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

# 'प्रतिक्रिया नको, प्रतिसाद द्या' : शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : किसनलाल जाजू व गोविंद जाजू स्मृती समारोह समितीच्या वतीने आयोजित इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी सत्कार व करियर मार्गदर्शन कार्यक्रम ढोकी रोडवरील साई मंगल कार्यालयात १७ जून रोजी उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्रा) व साहित्यिक डॉ. रवींद्र खंदारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनात समस्या येतात, त्या टाळण्यापेक्षा त्यांचे विश्लेषण करून तोंड द्यावे. प्रतिक्रिया देण्यापेक्षा प्रतिसाद द्यावा. जीवन ही एक शाळा आहे आणि पदोपदी परीक्षा असते. त्या परीक्षा पास करण्याची क्षमता शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सुरेश टेकाळे, जिल्हाध्यक्ष धाराशिव मुख्याध्यापक संघ उपस्थित होते. व्यासपीठावर गटशिक्षणाधिकारी संतोष माळी, करियर मार्गदर्शक राहुल इंगळे पाटील, श्रीनिवास जाजू, महेश जाजू उपस्थित होते.

गौरव झालेल्या विद्यार्थ्यांची यादी:

तालुक्यात प्रथम – १००% गुण:

दर्शन जनार्धन भामरे, विद्याभवन हायस्कूल कळंब यांना स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र व रोख ₹१०,००० देऊन गौरवण्यात आले.

गुणानुक्रमे गुणवंत विद्यार्थी:

वैष्णवी अडसूळ (जि.प. प्रशाला ईटकुर), पवन चौधरी, अमृता शिंदे (दोन्ही विद्याभवन हायस्कूल कळंब), अदिती राऊत (ज्ञानयोग विद्यालय कोथळा), नंदिनी पाटील व सिध्दांत बारकुल (दोन्ही विद्यानिकेतन विद्यालय येरमाळा).



आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थी – ९१% पेक्षा जास्त गुण:

पवन चौधरी, कृष्णा जाधव, प्रतिक्षा बोडके, समिक्षा आवाड, अर्पिता शेंडगे या पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी ₹५,००० आर्थिक सहाय्य देण्यात आले.

याशिवाय तालुक्यातील १००% निकाल लागलेल्या ९ शाळांचा गौरव करण्यात आला. प्रत्येक शाळेतील प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व पेन देऊन सन्मान झाला.

कार्यक्रमात करियर मार्गदर्शक राहुल पाटील यांनी सांगितले की, टॉपर वेगळा नसतो. निश्चय, वेळेचे नियोजन आणि कठोर परिश्रमाने कोणीही टॉपर होऊ शकतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जगदीश जाजू, सूत्रसंचलन सोपान पवार आणि आभार प्रदर्शन डॉ. अशोक शिंपले यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बालाजी अडसूळ, डॉ. गिरीश कुलकर्णी, राजेंद्र बिक्कड यांच्यासह जाजू कुटुंबीयांनी परिश्रम घेतले.

# पहाटेच्या धडक कारवाईत कळंब पोलिसांचा दारू माफियांवर घणाघात; ५ हातभट्ट्या उद्ध्वस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधी :कळंब शहरात पुन्हा डोके वर काढणाऱ्या अवैध गावठी दारूच्या व्यवसायावर कळंब पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने पहाटेच्या सुमारास संयुक्त धडक कारवाई करत हातभट्टी चालकांचे धाबे दणाणले आहेत.

दि. १७ जून २०२६ रोजी पहाटे कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शकील शेख आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पोलीस निरीक्षक हरीभाऊ लांडे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने शहरातील पाच ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. या धाडसी कारवाईने अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली.



कारवाईत पोलिसांनी तब्बल १२० लिटर तयार गावठी दारू, २६० लिटर गुळमिश्रित रसायन आणि दारू निर्मितीसाठी लागणारे इतर साहित्य जप्त केले. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख ४ हजार ७५० रुपये इतकी आहे. घटनास्थळीच संपूर्ण रसायन आणि साहित्य नष्ट करून पोलिसांनी अवैध व्यवसायाचे कंबरडे मोडले. या प्रकरणी पाच स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कायद्याला आव्हान देणाऱ्यांना कोणतीही गय केली जाणार नाही. अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहतील, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे.

ही मोहीम पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

कारवाईत पोलीस नाईक माळवे, पोलीस अंमलदार कदम, भोसले, मोटेगावकर, महिला पोलीस अंमलदार क्षीरसागर तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पथक सहभागी होते.

अवैध मद्य व्यवसायाविरोधातील या कारवाईमुळे कळंब शहरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दारू माफियांवर अशीच कठोर कारवाई सातत्याने सुरू ठेवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.